तक्रारदार

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** पुसेगांव **Year (वर्ष):** 2023

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0069 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/03/2023 04:02 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 27/03/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/03/2023
   **Time From (वेळेपासून):** 16:41 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:41 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 28/03/2023 **Time (वेळ):** 02:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 007 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/03/2023 04:01 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 21 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** डिस्कळ ,ता खटाव

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** कौस्तुभ विक्रम नलवडे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2004 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय,डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | डिस्कळ ,ता खटाव,पुसेगांव,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | डिस्कळ ,ता खटाव,पुसेगांव,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** शेतकरी

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7276128995

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जय रामदास बर्गे | | | 1. साई कलनी सुभाषनगर,कोरेगाव ,ता कोरेगाव,कोरेगाव,सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

खबरी जबाब दिनांक 28/03/2023

मी, कौस्तुभ विक्रम नलवडे वय 19 वर्षे, शिक्षण - बारावी, व्यवसाय - शेती, रा.मु.पो.डिस्कळ ता.खटाव जि.सातारा मोनं 7276128995

समक्ष पुसेगाव पोलीस स्टेशन मध्ये हजर होवून खबरी जबाब देतो की,मी वरील ठिकाणचा राहणारा असुन मी सध्या शेती करत आहे. माझे कुटुंबाची मौजे डिस्कळ ता.खटाव जि.सातारा या गावी गट नं 98 मध्ये एकुण क्षेत्र 11 एकर असुन ते माझे आजी व्दारकाबाई ऊर्फ प्रभावती रंगनाथ नलवडे हिचे नावावर असुन आजोबा रंगनाथ दौलतराव नलवडे हे मयत झाले आहेत. आमची या व्यतिरीक्त डिस्कळ गावातच गट नंबर 585 मध्ये आणखीन दिड एकर जमीन असुन ती देखील आजी व्दारकाबाईच्या नावावर आहे. सदर सर्व जमीनीचे खाते फोड करणेकरीता मागील महीन्यात मी आमचे गावातील बर्गे तलाठी यांना समक्ष भेटलो होतो त्यावेळी मी त्यांना खाते फोड करण्याकरीता आवश्यक असलेले सातबारा उतारे व फेरफार उतारे दिले होते. त्यावेळी त्यांनी सदर कामाकरीता मला एकुण 25,000/-रुपयेची मागणी केली. त्यावर मी त्यांना माझ्याकडे एवढे पैसे नाहीत असे म्हणालो. त्यानंतर शेवटी त्यांनी 20,000/- रुपये तरी द्यावे लागतील असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी माझ्याकडुन रुपये 10,000/- घेतले व तुझे काम करुन देतो,काम झाल्यावर उरलेले 10,000/- रुपये द्यावे लागतील असे सांगीतले. परंतु आज पर्यंत त्यांनी माझे खातेफोडीचे काम केले नाही.मागील आठवडयात गावातील तलाठी कार्यालयात तलाठी बर्गे यांनी खाते फोडकरण्याकरीता आई राजश्री विक्रम नलवडे, बहीण वैष्णवी विक्रम नलवडे, आजी व्दारकाबाई ऊर्फ प्रभावती रंगनाथ नलवडे, व माझी अशा सर्वांच्या कागदपत्रांवर सह्या घेतल्या व काम करुन देतो पण मी सांगीतल्याप्रमाणे उरलेले 10,000/- रुपये हे तुला द्यावेच लागतील असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने हो म्हणुन माझ्या घरी निघुन आलो.

त्यांनतर मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा येथील पोलीस उपअधीक्षक वैद्य मॅडम यांना फोन करुन मला बर्गे तलाठी हे खातेफोड करण्यासाठी लाचेची मागणी करत असलेबाबत हकीकत सांगीतली त्यानुसार वैद्य मॅडम यांनी त्यांचे कार्यालयातील पोलीस निरीक्षक राऊत हे मला संपर्क करुन माझ्या तक्रारीनुसार कारवाई करतील असे सांगीतले. त्यानुसार मी पो.नि.राऊत यांनी माझ्याशी संपर्क केला असता मी त्यांना मला सातारा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात येण्यास जमणार नाही तुम्हीच डिस्कळ येथे येवुन माझ्या तक्रारीनुसार कारवाई करावी अशी विनंती केली.

त्यानुसार पो.नि.राऊत,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा यांनी मला संपर्क करुन दिनांक 27/03/2023 रोजी 14.30 वा. चे सुमारास पुसेगाव ते फलटण जाणारे रोडवर डिस्कळ गावाच्या अलीकडे 1 किलोमीटर अंतरावर रस्त्यावर थांबून राहणेबाबत सुचना दिली.

त्यानंतर पो.नि.राऊत, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा यांनी दिनांक 27/03/2023 रोजी पुसेगाव ते फलटण जाणारे रस्त्याचे

कडेला येवून माझ्याशी संपर्क साधुन मला तेथे बोलावून घेतले. त्यावेळी मी तिथे माझ्याकडील दुचाकी क्रमांक एमएच 11 सी.एम. 6489 वरुन राऊत साहेबांनी सांगीतलेल्या ठिकाणी हजर झालो. त्यावेळी राऊत साहेब यांनी गाडीतील पंचांची माझेशी व माझी गाडीतील पंचांशी ओळख करुन देवुन पंचाना माझी तक्रार थोडक्यात सांगीतली की बर्गे तलाठी हे खातेफोड करण्याच्या कामाकरीता 10,000/- रुपये लाचेची मागणी करत असुन त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी अशी तक्रार असुन तशी मी सविस्तर तक्रार नोदंविली असल्याचे सांगीतले माझी लेखी तक्रार पंचांना वाचायला देवुन त्यावर पो.नि.राऊत व दोन्ही पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर पो.नि.राऊत यं◌ाचे सुचनेवरुन पो.शि.येवले यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व सिलबंद मेमरी कार्ड मला व दोन्ही पंचांना दाखवुन त्याबाबत संपुर्ण माहीती देवुन त्यांचेकडील सिलबंद मेमरी कार्ड काढुन व्हाईस रेकॉर्डर मध्ये घातले त्यानंतर पो.नि.राऊत यांनी मला व पंच नं.1 पाटील यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डर सह मला पंच नं.1 यांना बर्गे तलाठी यांची भेट घेण्यासाठी पाठविले ती वेळ 15.10 वा ची होती सदर वेळी सापळा पथकातील इतर लोक हे पुसेगाव ते फलटण जाणारे रोडवर थांबुन होते. मी तलाठी कार्यालयात गेलो तेव्हा मला बर्गे तलाठी कार्यालयात दिसले नाहीत म्हणुन मी त्यांना माझे मोबाईल फोन नंबर 7276128995 वरुन त्यांचे मोबाईल फोन नंबर 9730628532 वर फोन केला व बर्गे तलाठी यांना कुठे आहे असे विचारले असता त्यांनी पंचायतीतच आहे असे सांगीतले व ते लगेच माझ्या जवळ कार्यालयात आले. तेव्हा मी त्यांना माझ्या कामाच काय झाल माझ काम कुठवर आलय असे विचारले असता बर्गे तलाठी यांनी 'काय झाल होत त्यावेळेस कस ठरल होत की 20 तारखेपर्यंत तुमी बाकी तुमी देणार होता देवुन टाका की लगीच आज सही करु उद्याच्या उद्या, परवाच्या आत म्हणल होवुन जाईल आपल'. असे म्हणुन बर्गे तलाठी म्हणले की वीस मध्ये ठरलय दहा दिलेत, पाच आणखीन द्याला लावा, पाच तुमाला आणुण द्यायला लागेल तेवढं सहकार्य करा, तुमची परिस्थीती नायतर आता पाच हजार तरी आता द्या असे म्हणाले, त्यावेळी मी त्यांना आज्जीला आज किंवा उद्या पैसे मिळणार आहेत मी तुम्हाला पैसे लगेच आणुन देतो असे म्हणुन तिथुन निघुन आलो. त्यानंतर मी व पंच असे सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो ती वेळ 15.32 ची होती त्यानंतर पोलीस निरीक्षक सचिन राऊत यांच्या सुचनेनुसार पो.शि.येवले यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर पो.नि.राऊत यांनी मला व पंच नंबर 1 यांना झालेली हकीकत विचारुन तसेच रेकॉर्डर मधील संभाषण ऐकुन बर्गे तलाठी यांनी माझ्याकडे 5000/- रुपये लाचेची मागणी केलेची पो.नि.राऊत व दोन्ही पंचांची खात्री झाली. परंतु वेळेच्या अभावी पडताळणी पंचनाम्याची कारवाई नंतर करण्यात येईल असे पो.नि.राऊत यांनी मला सांगीतले.

त्यांनतर पो.नि.राऊत यांनी सापळा कारवाईचे नियोजन करुन मला 5000/- रुपये हजर करण्यास सांगीतलेने मी 5000/- रुपये इतकी लाच रक्कम पो.नि.राऊत यांचेकडे हजर केली. पो.नि.राऊत यांनी सापळापुर्व व सापळा कारवाईची थोडक्यात माहीती मला व पंचांना सांगुन अंथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहीती देवुन त्याचे प्रात्यक्षिक खाजगी वाहनातच करुन दाखविले. पो.नि.राऊत यांच्या सुचनेनुसार पथकातील पो.ना.ताटे यांनी 5000/- रुपये लाचेच्या रकमेस अंथ्रासीन पावडर लावली व ती लाचेची रक्कम माझ्या टीशर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. मनुष्यबळाची कमतरता असलेने पो.ना.ताटे यांना पुन्हा त्यांचे हात स्वच्छ धुवुन घेवुन सापळा पथकात सामील केले. सदरची सापळापुर्व कारवाई खाजगी वाहनामध्येच पुर्ण करण्यात आली. पो.नि.राऊत यांनी मला व पंचांना तसेच सापळा पथकाला कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या आणि मला व पंच नंबर 1 यांना लाचेची रक्कम घेवुन लाचेची रक्कम बर्गे तलाठी यांना देण्यासाठी रवाना केले ती वेळ 16.20 वा.ची होती.

त्यानंतर मी व पंच नंबर 1 माझ्याकडे असलेल्या दुचाकी वरुन डिस्कळ तलाठी कार्यालयात गेलो. तेव्हा तिथे बर्गे तलाठी यांच्या समक्ष जावुन पैसे घेवुन आलो असल्याबाबत इशारा केला. तेव्हा बर्गे तलाठी यांनी मला शेजारील झेरॉक्सच्या दुकानातील शिपटे यांचेकडे 5000/- रुपये देण्यास सांगीतले तेव्हा मी शिपटे यांचेकडे पैसे देण्यास गेलो असता शिपटे हे त्यांच्या मुलीला घेवुन घाईघाईने बाहेर चालले होते तेव्हा मी त्यांना तलाठी आण्णांनी पैसे देण्यास सांगीतले होते असे सांगीतले असता ते काय म्हणले असे म्हणुन तिथुन निघुन गेले म्हणुन मी पैसे शिपटे यांच्या दुकानाच्या काउंटरवरील चॉकलेटच्या बरणीखाली ठेवले तेव्हा तिथे बर्गे तलाठी आले तेव्हा मी त्यांना लाच रक्कम ज्या बरणीखाली ठेवली तिकडे बोटाने इशारा केला तेव्हा त्यांनी सदरील लाच रक्कम बरणीखालुन घेवुन तलाठी कार्यालयाकडे जात असताना मी सापळा पथकाला दिसेल अशा रितीने डाव्या हाताने दोन वेळा केसावर हात फिरवुन पुर्वनियोजीत इशारा केला.

सदर इशारा पाहुन पोलीस निरीक्षक राऊत व पथकाने माझ्या जवळ येवुन माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर पो.शि.येवले यांनी काढुन घेवुन पो.नि.राऊत यांचेकडं◌े दिला व त्यांनी तो बंद केला ती वेळ 16.41 वा. ची होती त्यांनतर सापळा पथकाने बर्गे यांना 16.42 वा चे सुमारास तलाठी कार्यालाशेजारील गाळ्याचे समोरुन ताब्यात घेतले. त्यानंतर सापळा पथक पंचनाम्याची पुढील कारवाई करीता पुसेगाव पोलीस स्टेशन येथे आले व याच ठिकाणी सापळा पंचनाम्याची कारवाई पुर्ण करण्यात आली आहे.

अशा रितीने दिनांक 27/03/2023 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई मध्ये लोकसेवक जय रामदास बर्गे वय 32 वर्षे, तलाठी सजा डिस्कळ ता.खटाव जि.सातारा वर्ग - 3 रा. साई कॉलनी सुभाषनगर,को◌ेरेगाव ता.कोरेगाव जि.सातारा यांनी माझ्या आजीच्या नावे असलेल्या जमीनीची खाते फोड करुन नोंद धरुन सातबारा उतारा देण्याकरीता. 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम शेजारील अजय बाळकृष्ण शिपटे यांचेकडे देण्यास सांगीतली असता ते बाहेर गेलेने मी सदरची लाच रक्कम अजय शिपटे यांच्या दुकानातील काउंटरवर चॉकलेटचे बरणीखाली ठेवली असता लोकसेवक जय रामदास बर्गे यांनी सदर लाचेची रक्कम 16.41 वा चे सुमारास काऊंटरवरील चॉकलेटचे बरणी खालुन ताब्यात घेवुन लाचेच्या रकमेचा स्विकार केला.म्हणुन माझी जय रामदास बर्गे, तलाठी, सजा डिस्कळ ता.खटाव जि.सातारा याचेविरुद्ध कायदेशीर तक्रार आहे.

माझे बर्गे तलाठी यांचेशी कसलेही पुर्ववैमनस्य नाही. तसेच आमचेत कसलाही आर्थिक देवाणघेवाणीचा व्यवहार नाही. माझी वरील तक्रार माझे सांगणेप्रमाणे लॅपटॉपवर मराठीमध्ये टंकलिखीत करण्यात आली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष हे लिहुन दिले.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

or (किंवा)

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** Balasaheb basavraj londhe

**Rank (पद):** SI (Sub-Inspector)

**No.(क्र.):** **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Yoshita

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

28/08/2023
04.15

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

पोलीस स्टेशन अधिकारी पुसेगाव

**Name** (नाव): Sandeep Madhukar Shitole

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): api